# ‘आई’



जगाच्या पाठीवर देवाने प्रत्येकाला ‘आई’ दिली आहे.
कारण, तिन्ही लोकांच्या गाडीचं इंजिनच ‘आई’ आहे.
जगात प्रत्येकाला देवाने ‘आई’ दिली आहे.
कारण, आईमुळेच सर्वांना सर्वकाही मिळणार आहे.
आईच नसेल तर, जग उदास-नाकाम आहे.
जगामधील प्रत्येक माणूस हा मेल्यासारखा आहे.
‘आई’ या शब्दाची अशी काही माया आहे.
तिच्या मुलांवर असणारी ति नेहमीची ‘साया’ आहे.
अशी आई तिच्या मुलांना स्वतःच्या जिवाहून जास्त जपते
त्याच आईच्या मुलांना वृद्ध पणी तिची काही कदर नसते.
त्यांना काय माहित, तेही कधीतरी ‘आई’ होणारच आहेत.
पण, ‘जशास तसे’ असे निसर्गाचेच नियम आहेत.
एकवेळ माणसांचे निमय मोडतिल पण निसर्गाचे थांबणार नाहीत.
जर माणूस चुकत असेल तर, त्याल शिक्षा दिल्याशिवाय राहणार नाहीत.
निसर्गाचे नियम हे नेहमी सत्यच घडतात.
‘आई’ च्या वाईटावर जे-जे असतात ते सर्व शेवट पर्यंत सडतात.

**मयुर जोशी**
**प्रथम वर्ष, वाणिज्य**

